International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# परधान समाजाच्या लोकसाहित्यातील भारतीयत्व: एक चिंतन

**कांचन रमेशराव मसराम[1], डॉ. युवराज मानकर[2]**

[1] *संशोधक, मराठी आचार्य पदवी संशोधन केंद्र,*

*भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव, जि. यवतमाळ*

[2] *प्राध्यापक, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,*

*भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभुळगाव, जि. यवतमाळ*

*Corresponding Author – कांचन रमेशराव मसराम*

**DOI - 10.5281/zenodo.17662068**

***सारांश :***

*'परधान समाजाच्या लोकसाहित्यातील भारतीयत्व : एक चिंतन' या विषयाच्या अनुरोधाने परधान समाजाच्या लोकसाहित्याचा अभ्यास करित असतांना सुरुवातीला आदिवासी म्हणजे काय ? आदिवासी समाज समूहात कोणकोणत्या जमातींचा समावेश होतो ? त्यात परधान समाज म्हणजे काय ? त्यांचे लोकसाहित्य कोणते ? याची अभ्यासपूर्ण मांडणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रधान समाजाच्या लोकसाहित्याचा आणि भारतीय संस्कृतीचा कशाप्रकारे संबंध प्रस्थापित झालेला आहे, याचे देखील वर्णन या शोधनिबंधामध्ये करण्यात आलेले आहे. एकूणच परधान समाजाच्या लोकसाहित्याचा संपूर्ण समाजाला परिचय व्हावा आणि त्यांच्या संस्कृतीचे जतन व्हावे हाच मूळ उद्देश डोळ्यांसमोर ठेवून उपरोक्त विषयावर शोधनिबंध लिहिण्यात आला आहे.*

***बीज शब्द : आदिवासी समूह, परधान समाज, लोकसाहित्य, भारतीय संस्कृती, निसर्ग.***

**प्रस्तावना :**

संपूर्ण जगामध्ये भारत हा असा एकमेव देश आहे की, ज्या देशाची संस्कृती, भाषा, धर्म, जाती, भौगोलिक परिस्थिती, इतिहास, यामध्ये भिन्नता आढळते. तरीही या देशात प्रेम, बंधुभाव, राष्ट्रीय एकता, समानता, स्वातंत्र्य ही नैतिक मूल्ये जोपासली जातात. याच वैविध्यपूर्ण देशात एक मूळनिवासी लोकांचा समूह प्राचीन काळापासून वास्तव्य करत आहेत, तो म्हणजे आदिवासी समाज समूह होय.

आदिम समुदाय हा निसर्गाचा 'प्रथम पुत्र' म्हणून ओळखल्या जातो, याचे कारण निसर्ग हा त्यांचा सर्वेसर्वा आहे. म्हणजेच आदिवासींच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंतचा संपूर्ण प्रवास हा निसर्गातूनच मार्गक्रमण करताना आढळून येतो. निसर्गाचे रक्षण व संवर्धन करणे हे आदिवासींचे प्रथम कर्तव्य आहे असे तो मानतो. या आदिवासी समाज समूहामध्ये भारताचा विचार करतात एकूण 705 जमाती आहेत 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या 104.2 दशलक्ष म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या 8.6% इतकी आहे. या आदिवासी समूहामध्ये विविध पोटजातींचा समावेश होतो. त्यामध्ये भिल्ल, संथाल, मुंडा, गोंड, गारो, खासी, जैतिमा, ठाकर, आंध, पारधी, मीना,

वारली, कोरकू, कोलाम, परधान, थोटी, इत्यादींचा समावेश होतो. या जमातींची स्वतःची परंपरा व मातृभाषा आहे. त्यांची संस्कृती ही निसर्गाशी निगडित असल्यामुळे त्यांच्या लोकसाहित्यात याचे प्रतिबिंब दिसून येते. म्हणजेच लोकगीत, लोककथा, लोकमिथके, लोकनाट्य, लोकरंगभूमी या सगळ्यांमध्ये निसर्ग हा प्रथम स्थानी आहे. आदिवासींचे लोकसाहित्य लिखित स्वरूपात नसून ते मौखिक (तोंडी) स्वरूपात आहे. ही मौखिक परंपरा पिढ्यान् पिढ्या पुढे-पुढे चालत आलेली आढळून येते.

आदिवासी समुदायातील परधान ही नाविण्यपूर्ण अशी जमात आहे. या समाजाला ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. हा समाज प्रामुख्याने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश (तेलंगाणा), छत्तीसगढ येथे वास्तव्य करित आहे. परधान समाज हा इतर आदिवासी जमातींपेक्षा भिन्न संस्कृती जपणारा, स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणारा समाज आहे. परधान लोक हे पारंपारिकरित्या गोंडांचे पुजारी, गायक व आख्यायिकांचे जतन करणारे म्हणून ओळखले जातात. त्यांचे लोकसाहित्य केवळ गाणी, कथा, नृत्य, एवढ्यापुरते मर्यादित नसून त्यातून भारतीय संस्कृतीचे खोल तत्वज्ञान, सामाजिक बांधिलकी, आध्यात्मिक विचारसरणी व मानवातवादी जीवनमूल्ये प्रकट होतात.

या लोकसाहित्यात भारतीयत्वाची अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात, जसे की, नैसर्गिक एकता, सामुहिक जीवनशैली, धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन, न्याय, समता, सहिष्णूता आणि बंधूता, इत्यादी. त्यामुळे परधान समाज म्हणजे काय ? परधान समाजाच्या लोकसाहित्यातून भारतीयत्वाचे दर्शन कसे होते ? या सर्व प्रश्नांचे चिंतन करून शोध घेणे हा या शोधनिबंधाचा मुळ हेतू आहे.

**शोधनिबंधाची समस्या :**

परधान समाजाला नेहमीच गोंडांपेक्षा दुय्यम स्थान देण्यात आले आहे. परधान हा गोंडांच्या राजदरबारी प्रधानमंत्री म्हणजे नोकराचे काम करणारा असे हिनवण्यात आले. त्यामुळे तो ही एक मानव समाज आहे, त्याची देखिल उच्च दर्जाची संस्कृती असू शकते, याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे त्यांची मौखिक साधनसंपदा अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. तसेच आधुनिक जीवनपद्धतीमुळे त्यांची लोकगीते, लोककथा, नृत्य हे लोप पावत आहेत. त्यामुळे परधान समाजाच्या लोकसाहित्यातील भारतीयत्वाची मूल्ये शोधणे व त्यांचे जतन करणे महत्वाचे आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

1) लोकसाहित्य संकल्पनेचा अभ्यास करणे.
2) परधान समाजाचा परिचय करून देणे.
3) परधान समाजाच्या लोकसाहित्याचा अभ्यास करणे.
4) लोकसाहित्यातून प्रकट होणाऱ्या भारतीयत्वाचे घटक समजावून घेणे.
5) आधुनिक काळात परधान लोकसाहित्याचे महत्व स्पष्ट करणे.

**शोधनिबंधाची गृहितके :**

1) लोकसाहित्याच्या संकल्पनेचा अभ्यास केल्यास समाजाच्या परंपरेचा, संस्कृतीचा खरा चेहरा दिसून येईल.
2) परधान समाजाची परंपरा व इतिहास यांची वाटचाल समृद्ध आहे.
3) परधान समाजाच्या लोकसाहित्यातून संपूर्ण जीवनशैलीचा आढावा घेता येणार आहे.

4) परधान समाजाचे लोकसाहित्य भारतीय संस्कृतीशी घट्टपणे जोडले गेले आहे.
5) परधान समाजाचे लोकसाहित्य हे नविन पिढीला दिशा देणारे आहे.

**शोधनिबंध विषयाचा आढावा :**

आजपर्यंत परधान समाजाच्या लोकसाहित्यासंबंधी विविध अभ्यासकांनी अध्ययन व संकलनाद्वारे साहित्य निर्मिती केली आहे. त्यामध्ये डॉ. गोविंद गारे, डॉ. शैलजा देवगावकर, डॉ. विनायक तुमराम, ॲड. सी. बी. मडावी, व्यंकटेश आत्राम, प्रा. वसंत कन्नाके, श्यामराव हिवाळे, इत्यादींनी परधानांच्या साहित्यकृतीवर प्रकाश टाकला आहे. अनेक विद्यापीठातून या लोकसाहित्यावर संशोधन कार्य सुरू आहे. असे असतांना देखील 'परधान समाजाच्या लोकसाहित्यातील भारतीयत्व : एक चिंतन' या विषयाच्या अनुषंगाने अद्यापही लिखाण झालेले नसल्यामुळे उपरोक्त विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी करून लिखाण करणे आवश्यक आहे.

**शोधविषयाची कार्यपद्धती :**

या शोधनिबंधात वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**प्राथमिक स्त्रोत :** परधान समाजातील लोकांकडून लोकगीते, लोककथा, दैवत यांची माहिती संकलीत केली आहे.

**दुय्यम स्त्रोत :** विषयावर आधारीत संदर्भ ग्रंथ, प्रबंध, शोधनिबंध, इंटरनेटचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**परधान समाजाच्या लोकसाहित्यातील भारतीयत्व - एक चिंतन :**

मानवाच्या आयुष्यात साहित्य हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून त्याचा उगम मानवी जीवनातील अनुभव, भाव-भावना, संस्कृती, परंपरा यामधून झालेला आहे. असे साहित्य की जे थेट जीवनाशी जोडलेले आहे, म्हणजेच हे साहित्य पुस्तकी न राहता लोकांच्या बोलण्यातून, कृतीतून, स्मृतीतून जीवंत राहते, यालाच 'लोकसाहित्य' असे म्हटले जाते.

**लोकसाहित्याची संकल्पना :**

'लोक' हा शब्द 'आम्ही भारताचे लोक' या प्रास्ताविकातून घेतलेला असावा. म्हणजेच असे निखळ लोक की, ज्यांच्या नि:स्वार्थी जीवन-जाणीवांतून, संघर्षातून निर्माण झालेले हे 'लोकसाहित्य' म्हणता येईल. लोकसाहित्य म्हणजे लोकांनी, लोकांसाठी रचलेले व लोकांच्या जीवनाशी घट्ट जोडलेले साहित्य होय.

हे साहित्य पुस्तकबद्ध न राहता, परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत राहते. या लोकसाहित्यात कथा, गाणी, म्हणी, नृत्ये, वाद्य, सण-उत्सव, खेळ, समारंभ, इत्यादींचा समावेश होतो.

लोकसाहित्याच्या व्याख्या अनेक अभ्यासकांनी केलेल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे –

**1) जोनस बॅलिस :**

"लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून परंपरागत असते, त्याचप्रमाणे सुसंस्कृत मानवाने देखिल निर्मिलेली असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्या द्वारा पद्य आणि गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोकप्रकार, त्याचप्रमाणे नृत्य, नाट्य, इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोकसाहित्य हे लोकसमुहाच्या अविष्काराचे शास्त्र नाही, तर लोकसमुहाच्या परंपरागत

चालत आलेल्या जीवनाच्या अविष्कारांचे शास्त्र आहे.” [1]

**2) मॉरिशस बोर्डो :**

“विविध व्यवसायांचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी आणि रूढी, तसेच व्यवहार या संबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येते, त्या सर्वांस लोसाहित्य म्हणावे.” [2]

**3) फ्रान्सिस पॉटर :**

“प्राचीन समाजजीवनाचे अविनाशी अवशेष म्हणजे लोकसाहित्य होय.” [3]

**4) डॉ. प्रभाकर मांडे :**

“लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजेच लोकसाहित्य असते.” [4]

**5) डॉ. गंगाधर मोरजे :**

“लोकसाहित्य हे केवळ मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेला वाङ्मयप्रकार नाही, उलट मौखिक आशय विधीसंबंधीत कृती व अभिनय यांच्या द्वारा सादर केलेला तो प्रयोग असतो. तो प्रयोग श्राव्य व दृश्य असतो. म्हणजेच ‘लोकसाहित्य ही प्रयोगात्मक कला आहे.” [5]

वरील अभ्यासकांच्या व्याख्येवरून असे लक्षात येते की, “लोकसाहित्य म्हणजे जनसामान्यांच्या भावविश्वातून उगम पावलेली आणि त्यांच्या व्यवहारातून व्यक्त होणारी कलात्मक अभिव्यक्ती आहे.” त्याचबरोबर “ग्रंथरूपाने नव्हे तर स्मृतींच्या आधारे जपलेले व पुढे नेलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य होय.” आजच्या जागतिकीकरणाच्या युगात लोकसाहित्य हे आपली मुळे, आपली ओळख जपणारे साधनच आहे.

अशाप्रकारे लोकसाहित्याचा आवाका प्रचंड मोठा आहे. त्यामध्ये दलित साहित्य, ग्रामिण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, संत साहित्य, आदिवासी साहित्य यांचा समावेश होतो. आदिवासी साहित्याचा अभ्यास करित असतांना प्रत्येक जाती-जमातींच्या लोकरूढी, परंपरा, संस्कृती, बोलीभाषा यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. त्यामध्ये परधान समाजाच्या लोकसाहित्याचा आदिवासी साहित्यात महत्वाचा वाटा आहे.

**परधान समाजाचा परिचय :**

‘परधान’ ही गोंडी (कोया) या समाजसमुहातील बुद्धिमान जमात आहे. विविध कलागुणांनी निपूण असलेला, निसर्गाशी जवळीक साधणारा, प्रामाणिक आणि भोळाभाबडा असा हा समाज आहे. यांना ‘गोंडांचे भाट’ म्हणून देखील ओळखले जाते. गोंड जरी स्वत:ला राजे म्हणवत असले तरी त्यांना राजत्व हे परधानांमुळेच मिळाले व टिकून राहिले, हे नाकारता येणार नाही. म्हणून डॉ. विनायक तुमराम लिहितात की, “संगीतगुरू हिरा सुक्का पाटाडी व धर्मगुरू पहांदि पारी कुपार लिंगो हे दोन धर्मपंडीत परधान नसते तर गोंडांची वंशवेल खुरटून धार्मिक-सांस्कृतिक तत्वज्ञानासह त्यांचा सामाजिक इतिहास काळाच्या उदरात केव्हाच गडप झाला असता”[6]. यावरून असे लक्षात येते की, परधान-गोंडांचा निकटचा संबंध आहे.

‘परधान’ या शब्दाची व्याख्या अभ्यासत असतांना त्यांचा इतिहास लक्षात घेणे आवश्यक आहे. म्हणजेच पर + धान = परधान, “धानाची शेती करणारा व त्यावर आपली उपजिविका भागविणारा समाज होय”, अशी व्याख्या केली जाते. त्याचबरोबर लेखक व्यंकटेश आत्राम हे ‘परधान’ या शब्दाच्या उत्पत्तीसंबंधी लिहितात की, “गोंडी संस्कृती जगणाऱ्या गोंड आणि प्रधान या जमातींना सामान्यत: सर्वच

जाणतात. गोंड लोकांना त्याच्या जमातीत व त्यांचे भाषेत सुद्धा 'कोयतूर' असे म्हणतात. कोयतूर आणि प्रधान ही नावे सुद्धा यात प्रधानच दिसून येतात. 'कोयतूर' या शब्दाचे संस्कृत स्वरूप 'कोयतू' असे होऊ पाहते. 'कोयतू' आणि 'प्रधान' या दोन्ही शब्दांमधील आद्याक्षरे वगळून त्यांचा सलग शब्द तयार केल्यास 'यतु:धाना' हा शब्द मिळतो, 'यातुधाना:' शी एकरूप होतो. यावरून सुद्धा गोंड-गवारी-प्रधान लोक जादूमंत्राचे उद्गाते ठरतात."[7] यावरून असे लक्षात येते की, परधान आणि गोंड ही एकमेकांशी जोडलेली जमात आहे. म्हणजेच परधान व गोंड यांची बोली, दैवता, सण-समारंभ, आडनावे यात कमालीचे साम्य दिसून येते.

परधान समाजाच्या एकूणच जीवनशैलीचा अभ्यास करत असतांना त्यांच्यातील विवाहपद्धती, कुळगोत्र पद्धती, सण-उत्सव, राहणीमान, विविध कला आणि जन्म-मृत्यू संस्कार याला अनन्यसाधारण महत्व आहे. वरील सर्वांचा संबंध निसर्गाशी जोडल्यास गैर ठरणार नाही. निसर्गशक्तीला पुजतांना आरत्या, गीते म्हटली जाते, आनंदाच्या प्रसंगी नृत्य केले जातात, विविध कथा व नाट्य सादर केले जातात आणि यातूनच लोकसाहित्याची निर्मिती झाल्याचे निदर्शनास आले आहे.

**परधान समाजाचे लोकसाहित्य :**

परधान समाजाचे लोकसाहित्य हे एक सुंदर चित्राप्रमाणे आहे, ज्यामध्ये विविध रंग भरले की, त्या कलाकृतीला सुंदर रूप प्राप्त होते. म्हणजेच परधान हा एक कलाकार, निर्माता, रसिक, श्रद्धाळू आणि बुद्धीवादी समाज समुह आहे. इतर जमातींच्या लोकसाहित्यापेक्षा वेगळे पण ज्ञानाने ओतप्रोत भरलेले साहित्य या समाजाने निर्माण केले आहे. परंतु वर्णव्यवस्थेचे वादळ या मायभूमीत शिरले आणि संपूर्ण आदिम समाजाला भयान अंधारात लोटून दिले. असे असले तरीही आहे त्या परिस्थितीतून नवे अंकूर निर्माण करण्याची ताकद या परधान समाजामध्ये आहे. म्हणूनच त्यांची लोकसंस्कृती व लोककला आजही जीवंत असल्याचे पहावयास मिळते.

परधान समाजाच्या लोकसाहित्याचे काही प्रकार पुढीलप्रमाणे –

**1) लोकगीते:**

परधान हा गाणारा मनुष्यप्राणी आहे. परधानाला 'पाटाडी' असेही संबोधले जाते. गोंडी संस्कृतीचे संगीत गुरू 'हिरा सुक्का पाटाडी' हे परधानच होते. म्हणजेच गायनकला ही निसर्गाने त्यांना दिलेली देणगीच आहे. या लोकगीतांमध्ये देवदेवतांची स्तुती, वीरांच्या कथांचे गायन, विवाह सोहळ्यातील पारंपरिक गीते, अंगाई गीते, उत्सव गीते, इत्यादी लोकगीतांचा समावेश होतो. परधान लोक देवाला आवाहन करतांना म्हणतात –

**आओ रे आओ रे यो मेरे देवता गोंडवाना के देव |**
**जग्गो रे जागो ओ मेरे देवता खबर हमारी लेव ||**

**……..(संकलीत)**

वरील गीतामध्ये गोंडी संस्कृतीचे उपासक, देवाला आमची काळजी घेण्यासाठी या असे आवाहन करत आहे. उपरोक्त गीत हे गोंडी भाषेतील असून परधानांची बोली ही गोंडी (कोया) आहे.

**2) लोककथा :**

परधानांच्या लोककथा या करमणूकीचे साधन नसून त्यांच्या जीवनाचा एक भाग आहे. यामध्ये परधानांची उत्पत्ती कथा, देवदेवतांच्या निर्मिती कथा, पूर्वजांच्या शौर्य कथा, सृष्टीच्या उत्पत्ती कथा, इत्यादींचा समावेश होतो. डॉ. शैलजा देवगावकर यांनी परधानांसंबंधी एक कथा सांगीतलेली आहे. ती अशी –

"गोंडांच्या सात भावांनी देवाची प्रार्थना आणि स्तुती केली पण देव काही प्रसन्न होईना. तेंव्हा लहान असणाऱ्या भावाने लाकडाच्या वाद्याला दोरी लावून देवाची स्तुतीपर प्रार्थना केली आणि गायली. तेंव्हा देव प्रसन्न झाले व देवाने प्रत्यक्ष दर्शन दिले. तेंव्हापासून देवाची स्तुतीपर गाणी गाणारे व 'बना' वाद्य वाजविणारे म्हणजे परधान असे संबोधल्या जावू लागले."[8]

**3) लोकनृत्य :**

परधान हा नृत्यांत पारंगत असलेला समाज होय. या समाजातील व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे नृत्य प्रशिक्षण घेण्याची गरज नाही, ती कला जन्मत:च त्यांना अवगत होते. लोकनृत्यात दंडार, ढेमसा, रेला नृत्य, इत्यादी नृत्यप्रकार आढळतात. हे नृत्य दिवाळी, दसरा, होळी या सणांना आवर्जुन सादर केले जातात. त्याचबरोबर ढोल, टिमकी, ताशा, घुंगरू, टिपऱ्या, सुरनाई अशा अनेक पारंपरिक वाद्याच्या सहाय्याने नृत्य सादर केले जातात. काही नृत्य फक्त पुरूष करतात. यामध्ये वेशभुषेला देखील अधिक महत्व आहे.

**परधान समाजाच्या लोकसाहित्याचा आणि भारतीयत्वाचा संबंध :**

भारतीयत्व ही केवळ एका भौगोलिक सीमेत राहण्याचा अनुभव नाही, तर ती एक विचारधारा आणि जीवनशैली आहे. भारताची ओळख हजारो वर्षांच्या इतिहासात घडलेल्या सामजिक, सांस्कृतिक, धामिक व राजकीय प्रक्रियांमधून घडते. बुद्ध-महाविरांच्या शिकवणीपासून तर ते मौर्य-गुप्तांच्या सुवर्णकाळापर्यंत तसेच स्वातंत्र्यलढ्यापासून ते लोकशाहीपर्यंत प्रत्येक घटकाने भारतीयत्वाच्या घडणीत आपले योगदान दिले आहे.

**भारतीयत्व म्हणजे काय ?**

भारतीयत्वाची सर्वसामान्य व्याख्या केली जाते, ती पुढीलप्रमाणे –

1) "भिन्न भाषा बोलणारे, भिन्न परंपरा असणारे लोक एका धाग्यात बांधले जाते, त्याला भारतीयत्व असे म्हणतात."
2) "भारतीयत्व म्हणजे भूतकाळातील वैभवाची जाण ठेवत भविष्याकडे वाटचाल करणारी जीवनपद्धती होय."
3) "भारतीयत्व हे 'वसुधैव कुटुंबकम्' या संकल्पनेचे लोकजीवनातील वास्तव रूप आहे."
4) "भारतीयत्व हे निसर्ग, समाज आणि अध्यात्म यांच्यातील संतुलन राखणारी जीवनशैली आहे."

भारतीयत्वाचे प्रकार अनेक समाजाच्या लोकसाहित्यातून दिसून येते. प्रामुख्याने परधान समाजाच्या लोकसाहित्यात विशेष करून पाहावयास मिळते.

**1) निसर्गाशी एकात्मता :**

भारतीय संस्कृतीत निसर्गाला देव मानले आहे. परधानांच्या गाण्यात डोंगर, झाडे, सुर्य-चंद्र-तारे, पक्षी यांना देवाप्रमाणे पुजतात. म्हणून निसर्ग आणि देश यात एकता आढळून येते आहे.

**2) धर्मनिरपेक्षता :**

परधानांच्या कथांमध्ये विविध देवतांचा उल्लेख केलेला आहे. ते एकाच देवापुरते मर्यादित न राहता विविध श्रद्धांना मान्यता देतात. इतरही धर्मांना ते महत्व देतात.

**3) सामुहिकता :**

परधान लोकगीते गातांना, नृत्य करतांना एकट्याने नव्हे तर संपूर्ण समुहाला त्यामध्ये सामिल

करतात. यामध्ये वैयक्तिक अस्तित्वापेक्षा समुहाचे असित्व मोठे मानले जाते.

**4) शौर्य व नितिमत्ता :**

परधान लोककथेमध्ये पूर्वजांच्या शौर्यकथा, अन्यायाविरूद्ध लढण्याची जिद्द, देशासाठी बलीदान, यातून शौर्य व नितिमत्तेची शिकवण मिळते.

**5) स्त्री-पुरूष समानता :**

परधान समाजात स्त्रीयांना समानतेची वागणूक दिली जाते. सर्वच कार्यात तिचा सहभाग महत्वाचा मानला जातो. लोकगीतांमध्ये तिच्या सन्मानाचा व अधिकाराचा उल्लेख येतो. हे भारतीयत्वातील समानतेच्या विचारांची जोडलेले आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात परधान समाजाचे लोकसाहित्य केवळ सांस्कृतिक वारसा नाही तर भारतीयत्वाच्या मूल्यांचे संवर्धन करणारे साधन आहे. यातून समाजात ऐक्य व बंधुभाव जागृत होतो, पर्यावरणाचे जतन केले जाते, विविधतेत एकतेची जाणीव होते.

**निष्कर्ष :**

उपरोक्त 'परधान समाजाच्या लोकसाहित्यातील भारतीयत्व : एक चिंतन' या शोधनिबंधाचा विचार केला असता, परधानांचे लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपात असून ते आधुनिक युगामध्ये विविध प्रसारमाध्यमांद्वारे (रेकॉर्डिंग, फोटोज) जतन करणे सहज शक्य झाले आहे. त्यामुळे मौखिककडून लिखित साहित्याकडे या लोकसाहित्याची वाटचाल सुरू झाली आहे. परंतु हे तेंव्हा शक्य होईल, जेंव्हा प्रत्येक परधान तरूण आपल्या संस्कृतीशी जोडलेला असेल. या स्पर्धेच्या युगामध्ये शिक्षणाची, नोकरीची चढाओढ सुरू आहे. त्यामुळे यासाठी आपली मुळ भूमी सोडून इतरत्र वास्तव्यास जावे लागल्यामुळे तेथील संस्कृतीचे वर्चस्व परधान समुहावर वाढत चाललेले आहे. एक दिवस असा येईल की, आपण आपल्या संस्कृतीसोबतच आपले अस्तित्वही गमवून बसू, यात तिळमात्र शंका नाही.

त्यासाठीच सर्व परधान समाजाला आपली संस्कृती, साहित्य वाचवायचे असल्यास जास्तीत-जास्त संशोधन व लेखन होणे गरजेचे आहे. परधान लोकसाहित्य केवळ आदिवासी समाजापूरते मर्यादित न राहता भारतीयत्वाच्या व्यापक संकल्पनेचे दर्शन घडवते. त्यामुळे या लोकसाहित्याचा अभ्यास भारतीय संस्कृतीच्या मुलभूत जाणीवा समजून घेण्याकरिता अत्यंत महत्वाचा आहे.

**संदर्भ सूची :**

1) मांडे डॉ. प्रभाकर – 'लोकसाहित्याचे स्वरूप', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पाचवी आवृत्ती, 28 नोव्हेंबर 2009, पृ. क्र. 15.
2) तत्रैव, पृ.क्र. 15.
3) तत्रैव, पृ.क्र. 24.
4) कालभूत डॉ. पुरूषोत्तम – 'लोकसाहित्य : स्वरूप व विवेचन', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 10 जाने. 2007, पृ. क्र. 17.
5) तत्रैव, पृ. क्र. 17
6) तुमराम डॉ. विनायक – 'आदिवासींच्या अस्तित्व खुणा : नवे संदर्भ, नवे आकलन', साईज्योती पब्लिकेशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 2023, पृ. क्र. 49.
7) आत्राम व्यंकटेश – 'गोंडी संस्कृतीचे संदर्भ', सुधिर प्रकाशन, वर्धा, व्दितीय आवृत्ती, 15 जाने. 2007, पृ. क्र. 138.
8) देवगावकर डॉ. शैलजा – महाराष्ट्रातील आदिवासींचे लोकसाहित्य', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, नोव्हेंबर-2011, पृ. क्र. 129.